**सा. प्र. वि./मंत्रालय उपाहारगृहे**

सामान्य प्रशासन विभाग (मंत्रालय उपाहारगृहे) करीता शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या १ सहायक कक्ष अधिकारी (आस्थापना विषयक कामकाज) शासकीय अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरुप | भरावयाची पदसंख्या | वय, अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | सहायक कक्ष अधिकारी | आस्थापनाविषयक बाबी | ०१ | १. सहायक कक्ष अधिकारी पदावरील कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>२. आस्थापना विषयक बाबी हाताळण्याचा अनुभव. |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :**

१) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय, दि. १०.०६.२०२५ अन्वये नमूद अटी व शर्तीच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक व भत्ते निश्चित करण्यात येतील,

२) करार पध्दतीने नियुक्त केलेल्या व्यक्तींना कोणतेही पदनाम असणार नाही व अर्जित, नैमित्तिक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाही.

३) नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

४) करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय / वित्तीय अधिकार नसतील, अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही. इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज, शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, आवश्यक त्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासह ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि २७.१०.२०२५ रोजी संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत सादर करावेत.

संपर्क : एम-१०, मंत्रालय पोटमाळा, सामान्य प्रशासन विभाग (मंत्रालय उपाहारगृहे), मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

ई-मेल: ulhas.kesarkar@nic.in

**(सं.सं.नवगिरे)**
**महाव्यवस्थापक,**
**मंत्रालय उपाहारगृहे**

# अर्जाचा नमूना

**सहायक कक्ष अधिकारी (गट-ब/अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांनी करार पध्दतीने नियुक्तीसाठी करावयाचा अर्ज.**

| पासपोट फोटो |
|---|

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवाराचे संपूर्ण नाव | |
| २ | पत्रव्यवहाराचा पत्ता व ई-मेल | |
| ३ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ४ | जन्मदिनांक | |
| ५ | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ६ | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | |
| ७ | सेवानिवृत्ती वेतन घेत असलेल्या बँकेचे नाव व खाते क्रमांक | |
| ८ | शैक्षणिक अर्हता : बोर्ड / विद्यापीठाचे नाव, उत्तीर्ण वर्ष टक्केवारी/श्रेणी याबाबतचा तपशील | |
| ९ | संगणक व इतर अर्हता | |
| १० | शासकीय कामकाजाच्या अनुभवाचा तपशील | |
| ११ | प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त नमूद माहिती सत्य व अचूक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहितीपैकी कोणतीही माहिती असत्य / चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास माझी निवड कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यास पात्र असल्याची आणि त्याबाबत कायदेशीर कारवाई होऊ शकते, याची मला पूर्ण जाणीव आहे. | |
| १२ | कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरुपाची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्ती असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणाधिकार हक्क निर्माण होत नाही. मी नमूद केलेल्या तपशीलाच्या सत्यप्रती मला मागणी केल्यास मी सादर करण्याची हमी देत आहे. | |

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

दिनांक :

स्थळ :

** वरीलप्रमाणे नमूद सर्व कागदपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे.